REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5. 7631(UIF)

# मूक्त विद्यापीठातील बी.एड. शिक्षणकमातील अध्ययनार्थीचा स्व जाणीवेचा अभ्यास

डॉ.दयाराम दु.पवार
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.



**सारांश :**

शिक्षण हे व्यक्तिला घडविण्याचे कार्य करते. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील पाकळयांचे फुलात रुपांतर शिक्षणामुळे होते. त्यासाठी शिक्षक शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये शिक्षकांचा व्यावसायिक विकास होणे आवश्यक आहे. शिक्षकाने केवळ विद्यार्थ्यांना माहिती न पुरविता विद्यार्थ्यांठी प्रेरक, मार्गदर्शक होणे गरजेचे आहे. शिक्षकाने स्वतःच्या स्व जाणीवेचा शोध घेतल्यास त्याला यशाचे समर्थन व अपयशाची जबाबदारी स्विकारता येईल. शिक्षक शिक्षण प्रशिक्षणामधून अध्ययनार्थींना विकास करण्यासाठी विविध सैध्दांतिक व प्रात्यक्षिकांचा बीएड मध्ये अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. मूक्त विद्यापीठाच्या बीएड शिक्षणक्रमामध्ये स्वजाणीव प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. त्यामुळे मूक्त विद्यापीठातून शिकणाऱ्या अध्ययनार्थींच्या हातून सक्षम विद्यार्थी घडविला जाईल.सदर पेपरमधून बीएड शिक्षणक्रमाच्या अध्ययनार्थींमध्ये स्वजाणीव हयाचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हयासाठी प्रथम वर्षांच्या बीएड 15 अध्ययनार्थींची निवड केली. स्व निर्मित प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात आले व निष्कर्ष मांडण्यात आले. खेळीमेळीचे वातावरणाची सवय असणे, स्वतःचा कामावर आत्मविश्वास असणे, इतरांना सहकार्य करण्याची वृत्ती, स्त्री पुरुष समानता, सदैव नविन शिकण्याची दृष्टी, अध्यापनाबरोबर प्रशासकीय कार्यात आवड, समाजसेवेची आवड, अध्यापक व्यवसायाच्या विकासासाठी सतत मनन, चिंतन करणे व त्यांच्यामध्ये इतरांपेक्षा वेगळया असणाऱ्या गोष्टीतून इतरांना सहकार्य करण्याची त्यांच्यामध्ये वृत्ती, खेळीमेळीचे वातावरण निर्माण करणे, सतत कामामध्ये मेहनत घेण्याची तयारी, प्रभावी व निटनिटके व्यक्तीमत्वाची असण्याची आवड, नेतृत्वक्षमता, इतरांप्रती सहानुभूती व नव्या बाबींशी समायोजन करण्याची क्षमता, आरोग्यविषयक जागरुकता व सतत वाचन व मनन करण्याची क्षमता असल्याचे दिसून आले.

**कळीचे शब्द :** स्व, स्व–जाणीव, शिक्षक शिक्षण, जमेच्या बाजू, व्यक्तिमत्वीतील त्रृष्टी, इतरांपेक्षा वेगळया बाबी.

**प्रस्तावना :**

शिक्षण हे व्यक्तिला घडविण्याचे कार्य करते. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील पाकळयांचे फुलात रुपांतर होणे आवश्यक आहे. त्यासाठी शालेय स्तरावर शिक्षकाची भूमिका महत्वपूर्ण ठरते. शिक्षण शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शिक्षकांचा व्यावसायिक विकास होणे आवश्यक आहे. शिक्षक शिक्षणावर नियंत्रण व गुणवत्ता विकसीत करण्याची जबाबदारी एनसीटीई करते. नव्या संरंचित बीएड अभ्यासक्रमामध्ये अध्ययन अध्यापन, अभ्यासक्रम, मूल्यमापन हयामध्ये बदल करण्यात आला आहे. त्यामुळे हया शिक्षक शिक्षणामध्ये सैध्दांतिक प्रात्यक्षिक कार्याचा समावेश केला आहे. एनसीटीईने 2014 प्रमाणे आता शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना माहिती न पुरविता विद्यार्थ्यांसाठी प्रेरक, मार्गदर्शक, कर्ता व कृती घडवून आणण्यास सक्षम बनविणे ही भूमिका आहे. शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकाला त्याच्या भुमिकेची माहिती असणे आवश्यक आहे. बदलते सामाजिक स्थित्यंतरे, भविष्यकालीन वेध, विविध विद्याशाखामधील ज्ञानाचा झालेला विकास, माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाच्या प्रवाह व पध्दतीमध्ये झालेले बदल हयाची ओळख शिक्षकाला असेल तरच तो विद्यार्थ्याचा

व्यक्तिमत्व विकास करु शकेल. हयासाठी शिक्षकाला त्याच्या स्व जाणीवेची ओळख असणे आवश्यक आहे. शिक्षकाने अंतर्मुख होवून विचार करणे आवश्यक आहे. त्याला त्याच्यातील जमेच्या बाजू माहिती होतील. याउलट त्याच्यातील ज्या मानसशास्त्रीय दृष्टया व्यक्तिमत्वातील त्रृटी अथवा मर्यादा आहेत त्यावर मात करणे आवश्यक आहे. शिक्षक हा विद्यार्थ्याचा आदर्श व नेता असल्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव विद्यार्थ्यावर पडतो. त्यामुळे विद्यार्थ्याच्या विकासाची जबाबदारी त्याच्यावर आहे त्यासाठी त्याला विद्यार्थ्याची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. त्यातुन सजाणीवेचा शोध घेणे आवश्यक आहे. स्व जाणीवेचा शोध घेतल्यास त्याला यशाचे समर्थन व अपश्याचे देखिल जबाबदारी स्विकारता येइल. स्व जाणीव मध्ये त्याला त्याच्या स्व चे जतन करता येईल. त्याने केलेले स्व चे जतन तो इतरासाठी देखिल करण्यास मदत करेल. शिक्षक शिक्षण प्रशिक्षणामधून अध्ययनार्थींना विकास करण्यासाठी विविध सैध्दांतिक व प्रात्यक्षिकांचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. मूक्त विद्यापीठाच्या बीएड शिक्षणक्रमामध्ये स्व जाणीव हया प्रात्यक्षिकाचा समोवश केल्यामुळे मुक्त विद्यापीठातून शिकणाऱ्या अध्ययनार्थींचा हातून सक्षम विद्यार्थी घडविला जाईल शिक्षकाचे व्यक्तिमत्व संतुलित व मानसिक आरोग्य सुदृढ राहील. स्व जाणीवेच्या माध्यमातून शिक्षक स्वताचा विकास करतील. म्हणून बीएड शिक्ष्ज्ञणक्रमाच्या अध्ययनार्थींमध्ये स्व जाणीव हयाचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात हया पेपर मधून करण्यात आला आहे.

## स्व संकल्पना व स्व जाणीवेचा शोध घेण्याची गरज :

स्व संकल्पनेता प्रथम उल्लेख विल्यम जेम्सने 1880 मध्ये केला. पुढे मेरी काफीन्सने 1915 मध्ये या स्व संकल्पनेचा मानसशास्त्रीय प्रयोगशाळेत अभ्यास केला. 1935 साली कूफ कोफकाने स्व संकल्पना व्यक्तिचा बोधावस्थेतील अनुभवाच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला. पुढे कुली आणि मिल हयांनी स्व संकल्पना ही सामाजिक आंतरक्रियातून विकसीत होते असे सांगीतले. अशा रितीने स्व संकल्पना मानसशास्त्रात रुढ झाली. 1949 मध्ये हिलगार्ड हया मानसशास्त्राने स्व चे व्यक्तिमत्वात मानसशास्त्रीय दृष्टया महत्व विशद केले. म्हणून स्व चा अभ्यास व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहे. स्व मुळे व्यक्तिला सुप्त गुणाचा विकास साधता येतो. त्याचा आंतरिक विकास साधता येतो त्याला सुख दुखावर मात करता येईल. तसेच व्यक्ती व्यक्तीमधील संबंध सुदृढ ठेवता येतात. सामाजिक, भावनिक, बौध्दीक विकासाठी स्व चा अभ्यास आवश्यक आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधनाव्दारे शिक्षकाच्या स्व जाणीवेचा शोध घेवून त्यांचा व विद्यार्थ्यांचा विकास साधता येईल असे वाटते.आजच्या बदलत्या काळामध्ये शिक्षकांना विविध कामे करावी लागतात. त्यात शैक्षणिक व अशैक्षणिक कामाचा समावेश होतो. त्यांना विविध कार्यासंबंधित जबाबदार ठरविले जाते. त्यामध्ये विद्यार्थ्याप्रत, समाजाप्रत, शासनाप्रत, अध्यायनाप्रत, पालकांपर्यंत, राष्ट्राप्रत त्याची कर्तव्ये निश्चित केलेली आहे. हया सर्वांसाठी कार्य करतांना त्याला त्याचा स्व चा इतरासमोर केवळ मुखवटा करुन राहावे लागते. आज विद्यार्थी व पालक आणि समाजाच्या अपेक्षांचे ओझे पूर्ण करण्यामागे त्याला त्याच्या व्यक्तिमत्वातील जमेच्या बाजूचा शोध घेता येणे कठीण जाते. तसेच त्याच व्यक्तिमत्वातील असणाऱ्या त्रृटींवर मात केली पाहिजे. हयासाठी त्याच्या स्व जाणीवेचा शोध घेणे आवश्यक आहे.

## मूक्त विद्यापीठातील स्व जाणीव या प्रात्यक्षिक कार्यपध्दती

बीएड शिक्षणक्रमासाठी विविध प्रात्यक्षिकांचा समावेश करण्यात आलेला आहे, सैध्दांतिक भागासंबंधीत प्रात्यक्षिके व इतर प्रात्यक्षिके आहेत. इतर प्रात्यक्षिकांमध्ये असलेल्या प्रात्यक्षिक मार्गदर्शिकातील प्रथम वर्षाला करावयाची प्रात्यक्षिके हया मध्ये स्व –जाणीव हया प्रात्यक्षिकांचा समावेश केला आहे. सदरील प्रात्यक्षिकासाठी एकुण पाच तासाचा कालावधी असून 1/4 श्रेयांक निर्धारित केलेले आहे. (संदर्भ – बीएड प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका 2016) खालील बाबीच्या आधारे अध्ययनार्थी अहवाल लेखन करतात.

## संशोधनाची उद्दिष्टे :

1. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींच्या स्व जाणीव संकल्पना अभ्यासणे
2. मूक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींच्या स्व जाणीवांच्या शोधाव्दारे त्यांना त्यांच्यातील इतरांपेक्षा वेगळया असणाऱ्या बाबींविषयी अवगत करणे.
3. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींच्या स्व जाणीवांच्या शोधाव्दारे त्यांना त्यांच्यातील जमेच्या बाजूंची ओळख करुन देणे.
4. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींची स्व जाणीवांच्या शोधाव्दारे त्यांच्यातील असलेल्या त्रृटींची माहिती करुन देणे.

5. मूक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींच्या स्व जाणीवांच्या शोधाव्दारे त्यांच्यातील असलेल्या त्रूटींवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन शीर्षक –** मूक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींचा स्व जाणीवेचा अभ्यास.

## कार्यात्मक व्याख्या –

**मूक्त विद्यापीठ :** मुक्त विद्यापीठ म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ होय.
**बीएड शिक्षणक्रम अध्ययनार्थी :** मूक्त विद्यापीठाकडून राबविल्या जाणाऱ्या दोन वर्षांचा शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम प्रथम वर्षाचे अध्ययनार्थी.
**स्व जाणीवेचा अभ्यास :** अध्ययनार्थींच्या व्यक्तिमत्वातील जमेच्या बाजू व उणिवा हयांचा स्वशोध घेणे म्हणजे स्वजाणीव

## संशोधनाची व्याप्ती :

1. सदर संशोधन हे मूक्त विद्यापीठातील बीएड शिक्षणक्रम करणाऱ्या अध्ययनार्थींशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्रातील मुक्त विद्यापीठातील बीएड शिक्षणक्रमापुरतीच व्याप्त आहे.

## संशोधनाची मर्यादा :

1. सदरील संशोधन हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बीएड शिक्षणक्रमा पुरतेच मर्यादीत आहे.
2. सदरील संशोधन हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील प्रथम वर्षातील अध्ययनर्थी पुरतेच मर्यादीत आहे.
3. सदरील संशोधन हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बीएड शिक्षणक्रमाच्या स्व जाणीव हया प्रात्यक्षिकापुरतेच मर्यादीत आहे.
4. सदरील संशोधन हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आयोजीत प्रथम वर्षाच्या पनवेल अभ्यासकेंद्रावरील बीएड 2017–2019 तुकडी पुरतेच मर्यादीत आहे.

## संशोधनाची पध्दती :

सदर संशोधन हे वर्तमानकालीन असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

## जनसंख्या व नमुना निवड :

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बीएड शिक्षणक्रमाला शिकणारे सर्व प्रथम वर्षाचे अध्ययनार्थी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. असंभाव्य पध्दतीतील सप्रयोजन पध्दतीने नमुना निवड करण्यात आला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आयोजीत केल्या गेलेल्या बीएड शिक्षणक्रमाच्या 2017–2019 पनवेल अभ्यासकेंद्रावरील तुकडीतील प्रथम वर्षाच्या बीएड अध्ययनार्थीतील एकुण 15 अध्ययनार्थीची निवड करण्यात आली.

## संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने स्वनिर्मित 5 प्रश्न असलेली प्रश्नावली विकसीत केली. सदर प्रश्नावली मध्ये 1 प्रश्न होय नाही स्वरुपाचे होते तर उर्वरीत चार प्रश्न हे मूक्त प्रश्न या स्वरुपाचे होते.

## माहितीचे अर्थनिर्वचन :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राप्त झालेल्या प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे विश्लेषण व अर्थविर्वचन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे. शेकडेवारी हया सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

### प्र.1 स्व जाणीव संकल्पनेविषयी तुम्हाला माहिती आहे का?

| अ.क्र. | उपघटक | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 15 | 100 |
| 2 | नाही | – | – |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

वरील सारणीतून मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींना स्व जाणीव हया प्रात्यक्षिकांविषयी माहिती आहे का हयाचा शोध घेतला असता 100 टक्के प्रतिसादकाने होय म्हटले आहे. हयाचाच अर्थ असा की सर्व अध्ययनार्थींना स्व जाणीव संकल्पनेची माहिती असल्याचे दिसून आले.

### प्र.2 तुमच्यात इतरांपेक्षा कोणत्या बाबी वेगळया आहेत?

| अ.क्र. | उपघटक | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सदैव कामात व वागण्यात प्रामाणिकपणा | 4 | 26.66 |
| 2 | इतरांप्रती सहानुभूति असणे | 3 | 20 |
| 3 | समायोजन करण्याची क्षमता | 3 | 20 |
| 4 | आरोग्यविषयक जागरुकता | 3 | 20 |
| 5 | नेतृत्वक्षमता असणे | 4 | 26.66 |
| 6 | प्रभावी व निटनिटके व्यक्तिमत्व असणे | 4 | 26.66 |
| 7 | वर्गातील व दैनंदिन खेळीमेळीचे वातावरणाची कला | 6 | 40 |
| 8 | सतत नव्याकामासाठी जिद्द व चिकाटीने मेहनतीची तयारी | 4 | 26.66 |
| 9 | सहकार्यशील वागणे व वर्तन | 5 | 33.66 |
| 10 | वचन व मननची आवड | 3 | 20 |

**विश्लेषण व अर्थविवेचन :**

वरील सारणीतून शेकडेवारी तंत्राव्दारे अध्ययनार्थीच्या स्व जाणीवांचा शोध हया प्रात्यक्षिकामधून अध्ययनार्थीमध्ये त्याच्यात इतरांपेक्षा वेगळया असणाऱ्या बाबींचा शोध घेतला.

### प्र.3 तुमच्यातील जमेच्या बाजूंचा कोणत्या?

| अ.क्र. | उपघटक | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | नेतृत्वक्षमता | 4 | 26.66 |
| 2 | खेळ व विविध कलांची आवड | 2 | 13.66 |
| 3 | स्वतावर आत्मविश्वास | 2 | 13.66 |
| 4 | इतराप्रती सहानुभूती | 3 | 20 |
| 5 | स्त्री–पुरुष समानता | 3 | 20 |
| 6 | आरोग्याकडे लक्ष देणे | 2 | 13.66 |
| 7 | समाजसेवा कार्यात सहभाग | 3 | 20 |
| 8 | सतत नाविन्याचा शोध | 2 | 13.66 |
| 9 | वाचन व मननची आवड | 3 | 20 |
| 10 | प्रशासकीय कामाची आवड | 2 | 13.66 |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

वरील सारणीतून अध्ययनार्थींमध्ये शेकडेवारी तंत्राच्या साहयाने जमेच्या बाजूंचा शोध घेतला

**प्र.4 तुमच्यातील त्रृटी कोणकोणत्या आहेत ते लिहा?**

| अ.क्र. | उपघटक | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | संकटाना घाबरणे | 3 | 20 |
| 2 | आरोग्याकडे दुर्लक्ष | 2 | 13.66 |
| 3 | वेळेचे नियोजन न करता येणे | 3 | 20 |
| 4 | प्रभावीपणे संप्रेषण व सादरीकरण कलेचा अभाव | 2 | 13.66 |
| 5 | लवकर राग येणे अथवा चिडचिड होणे | 5 | 33.33 |
| 6 | स्माजातील विघातक बाबीवर पटकन मत व्यक्त करणे | 2 | 13.66 |
| 7 | दैनंदिन अपेक्षा पूर्ण न झाल्यास त्रास करुन घेणे | 6 | 40 |
| 8 | दैनंदिन मोबाईलचा अति वापर करणे | 4 | 26.66 |
| 9 | वाचन करण्याकडे दुर्लक्ष करणे | 3 | 20 |
| 10 | नेतृत्वक्षमतेचा अभाव | 2 | 13.66 |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

वरील सारणीतून अध्ययनार्थींतील त्रृटींबबातचा शोध शेकडेवारी हया तंत्राने घेण्यात आले.

प्र.5 स्व जाणीव हया प्रात्यक्षिकाबाबत आपले मत नोंदवा?

**प्र.4 तुमच्यातील त्रृटी कोणकोणत्या आहेत ते लिहा?**

| अ.क्र. | उपघटक | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | स्वतामधील उणिवांची माहिती मिळाली | 7 | 46.66 |
| 2 | स्वमधील स्वताचे बलस्थाने समजली | 8 | 53.33 |
| 3 | स्वताच्या उणिवा दूर करण्याचा मार्ग मिळाला | 7 | 46.66 |
| 4 | स्वता बद्दल विचार करायला समजले | 5 | 33.33 |
| 5 | ठतर सर्व प्रात्यक्षिकापेक्षा हे प्रात्यक्षिक आवडले | 4 | 26.66 |
| 6 | इतरापेक्षा आपण वेगळे कसे ते कळाले | 2 | 13.66 |
| 7 | सदर प्रात्यक्षिक वैयक्तिक व सामाजिक विकासाकरिता उपयुक्तता | 4 | 26.66 |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

वरील सारणीतून अध्ययनार्थींना स्व जाणिव हया प्रात्यक्षिकाबाबत आपले मत नोंदवा असे सांगितले असता प्राप्त झालेल्या माहितीचे शेकडेवारी हया तंत्राने विश्लेषण करण्यात आले.

## संशोधनाचे माहितीच्या आधारे निष्कर्ष :

1. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकणाऱ्या अध्ययनार्थींना स्व जाणीवाबाबत सर्व अध्ययनार्थींना संकल्पना माहिती असल्याचे दिसून आले.

2. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमातील अध्ययनार्थीमध्ये त्यांच्यामध्ये इतरांपेक्षा वेगळया असणाऱ्या बाबींचा शोध घेतला असता त्याच्यामध्ये प्रामुख्याने इतरांना सहकार्य करण्याची त्यांच्यामध्ये वृत्ती 66 टक्के अध्ययनार्थीमध्ये दिसून आली. खेळीमेळीचे वातावरण निर्माण करणे ही वेगळी बाब 40 टक्के अध्ययनार्थीमध्ये दिसून आली. सतत कामामध्ये मेहनत घेण्याची तयारी, प्रभावी व निटनिटके व्यक्तीमत्वाची असण्याची आवड तसेच त्यांच्यात नेतृत्वक्षमता असल्याची 26.88 टक्के अध्ययनार्थीमध्ये दिसून आली. इतरांप्रती सहानूभुती व नव्या बाबींशी समायोजन करण्याची क्षमता 20 टक्के अध्ययनार्थीमध्ये असल्याचे आढळले. 20 टक्के अध्ययनार्थीमध्ये आरोग्यविषयक जागरुकता व सतत वाचन व मनन करण्याची क्षमता असल्याचे दिसून आले.

3. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमातील अध्ययनार्थीमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वातील जमेच्या बाजूंचा शोध घेतला असला असे निदर्शण्नास आले की, अध्ययनार्थीमध्ये नेतृत्वक्षमता असणारे 26 टक्के, वाचन व मननाची आवड 20 टक्के असल्याचे आढळले व खेळ व कलांची आवड, आरोग्याकडे सदैव लक्ष देणारे, सतत नविन शिकण्याची ओढ असणारे 13.66 अध्ययनार्थींना वाटते असे दिसून आढळले.

4. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमातील अध्ययनार्थीमध्ये त्यांच्यातील त्रूटींबाबतचा शोध घेतला असता अध्ययनार्थीच्या त्यांच्या दैनंदिन ठरविलेल्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास 40 टक्के अध्ययनार्थीना त्रास होत असल्याचे आढळले. तसेच एखाद्याने मनाविरुध्द बोलले किंवा कृत्य केले असता पटकन राग येणे अथवा चिडचिड होणे हया त्रूटी अध्ययनार्थीमध्ये 33.33 टक्के आढळते.दैनंदिन कार्यात मोबाईलचा अति वापर करणारे 26.66 टक्के तर अचानक आलेल्या संकटामुळे घाबरुन जाणे, योग्य वेळेचे नियोजन न करता येणे, वाचनाकडे, दुर्लक्ष करणे असे 20 टक्के लोकांना वाटते. तर अध्यापनाविषयक कार्य करतांना आपल्यामध्ये नेतृत्वक्षमतेचा अभाव व व्यवस्थीत सादरीकरण न करता येणे ही त्रूटी असल्याचे 13.66 टक्के अध्ययनार्थींना वाटते.

5. मुक्त विद्यापीठातून बीएड शिक्षणक्रमासाठी शिकत असलेलया अध्ययनार्थींना स्व जाणीव हया प्रात्यक्षिका बद्दल तुमचे मत व्यक्त करण्यास सांगितले असता अधिकतम अध्ययनार्थींना हया प्रात्यक्षिकांमुळे आपल्यामध्य असणारी आपली बलस्थाने हया प्रात्यक्षिकामुळे समजल्याची 53.33 टक्के अध्ययनार्थींना वाटते. तसेच आपल्यामधील असलेल्या उणिवांची माहिती झाल्यामुळे त्या उणिवा दूर करण्यासाठी हे प्रात्यक्षिक उपयुक्त झाल्याचे 46.66 टक्के अध्ययनार्थीना वाटते. तसेच दैनंदिन कामाच्या व्यापामुळे स्वताकडे स्वतःबद्दल अंतर्मूख होवून विचार करायला शिकलो असे 33.33 टक्के अध्ययनार्थींचे मत आहे. तर हया प्रात्यक्षिकांमुळे वैयक्तिक व सामाजिक विकासास उपयुक्त असल्याचे व सर्व बीएड शिक्षणक्रमाच्या प्रात्यक्षिकांपेक्षा वेगळे व उपयुक्त असल्याचे मत 26.66 टक्के अध्ययनार्थींचे दिसून आले.

## शिफारशी :

1. बीएड शिक्षणक्रमातील अध्ययनार्थींचा सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी स्व ची जाणीव प्रात्यक्षिके वेळोवेळी घेण्यात यावे. त्यामुळे रागावर काही प्रमाणात नियंत्रण मिळविणे शक्य होईल. अनावश्यक अपेक्षा बाळगू नये.
2. बीएड शिक्षणक्रमातील अध्ययनार्थीमध्ये स्व जाणीवेतून दिसून आलेल्या जमेच्या बाजूची जोपासना करण्यात यावी. कला, संगीत, खेळ व साहित्यातील नामवंत व्यक्तिचे चरीत्रे वाचण्यास सांगावे.
3. बीएड शिक्षणक्रमातील अध्ययनार्थीमध्ये स्व जाणीवेतून दिसून आलेल्या अध्ययनार्थीतील त्रूटींवर मात करण्यासाठी प्रामुख्याने त्यांना मार्गदर्शन करावे. उदा. मोबाईलचा अतिवापर टाळावा. पटकन न चिडता त्यावर विचार करुन प्रतिक्रिया द्याव्यात असे सांगावे.
4. बीएड अध्ययनार्थींच्या त्रूटीवर मात करण्यासाठी परीसंवादाचे, चर्चासत्राचे आयोजन करण्यात यावे. तसेच सभाधिटपणा व नेतृत्व कौशल्य विकसनासाठी अध्ययनार्थींना विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये संधी देण्यात यावी.
5. अध्ययनार्थींच्या सुप्तगुणांच्या प्रकटीकरणासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे. SWOC मधून त्यांना त्यांच्या मर्यादा व जमेच्या बाजूची ओळख होईल. तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजीत करावे.

## संदर्भग्रंथ सूची :


1. जगताप ह.ना., (2007), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे : नित्यनूतन प्रकाशन
2. पंडीत र.वि., (2006), शैक्षणिक मानसशास्त्र, नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स प्रकाशन.
3. साळुंके कविता (2016) बीएड प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका EDU 466, नाशिक : कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

4. Darade P.B.(Edi), (2015) National Conference on Implementation of Two Year Teacher Education Programme Conference Preceding, Gargoti: IQCA

National Conference

on

# POLICIES AND PROSPECTS OF TEACHER EDUCATION - 2019

NCPPTE - 2019

**5th and 6th January 2019**



**Organized by**

Post Graduate Department of Education and IQAC

Sant Gadge Baba Amravati University, Amravati

in Collaboration with

Maharashtra State Secondary Teacher Educator's Association (MSSTEA)

**Venue**

**A.V. Theater**

**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**